Page :
Date : / /

# माझा छंद

सौ. अनुराधा पाटील.

प्रत्येक माणसाला काहीतरी छंद असतो. तसा मला संगीत आणि त्यातल्या त्यात पेटी वाजविण्याचा छंद आहे.

किती मंजूळ स्वरात गाते पेटी.

पेटी म्हणजे संवादिनी किती समर्पक नांव आहे.
कारण ती आपल्याशी संवाद साधते. आपण आपली बोटे जशी त्यावरून फिरवू ती स्वर लावते. आणि आपल्याला आनंद देते. आणि मंत्रमुग्ध करते..

कोणतेही गाणं असो पेटीची साथ असली तर ते फारच श्रवणीय आणि गोड वाटते.

मोठ्या मोठ्या गायक कलाकारांबरोबर तिचं मानाचं स्थान असते. नाट्यगीतात तर असतेच असते.

वेगवेगळी वाद्य वेगवेगळ्या गाण्यांना साथ देतात. आणि गाणं अप्रतिम होते. आणि ऐकावेसे वाटते.

कोणत्याही आजारावर आणि दुःखावर संगीत हे औषध आहे. लहान बाळं सुद्धा संगीत ऐकल्यावर की शांत होतात.

तर अशी ही पेटी (संवादिनी)
माझी लाडकी सर्वांचीच.

मला पूर्वीपासून संगीताची आवड आहेच पण काही कारणामुळे शिकायचे राहून गेले.

पण आता जरा संसारीक जबाबदाऱ्या कमी झाल्यामुळे पेटी शिकायचे ठरविले..

माझ्या योगागुरू सौ. शोभाताईंना पण विचारले त्यांनाही संगीताची खूप आवड आहे.

आम्ही दोघींनी पेटी शिकायचे ठरविले.

क्लास शोधायला सुरुवात केली. आणि महेश विद्यालयात संगीत शिकवतात असे समजले. आम्ही चौकशी केली. आणि क्लास सुरू केला.

पेटी कशी वाजवतात याचे ज्ञान शून्यच होते.
सा. रे. ग. म. पासून शिक्षण सुरू झाले.



मॅडम खूपच छान शिकवायच्या मैत्रिणी पण मिळाल्या.
२ तास कसे जायचे हे कळायचे नाही.
आठवड्यातून २ दिवस क्लास असायचा.
प्रथम भूप रागापासून सुरुवात झाली. तद्नंतर पुढचे राग शिकलो. खूप छान वाटायचे. मजा यायची.
थोडंस शिकल्यावर मॅडमने परिक्षा द्यायला सांगितली.
मी तयारी सुरू केली.
पहिली परीक्षा दुर्गा रागावर दिली.
छान मार्कस् मिळाले. दुसरी पण परीक्षा छान झाली.
आपल्याला पेटी वाजवता येते याचे कौतुक वाटू लागले.
पण काही कारणामुळे क्लास बंद करावा लागला.
आम्ही घरीच प्रॅक्टीस सुरू केली.
काही दिवसांनी परत क्लास लावायचे ठरविले. पण आम्हाला सुगम संगीतावर पेटी शिकायची होती.
योगायोग म्हणजे माझी भाची सौ. सुखदा जोशी. लग्न होऊन पुण्यात आली. ती स्वतः ही संगीतकार आणि गायीका आहे. तिला क्लासबद्दल विचारले. आणि तिने आमचा क्लास सुरू केला.
आणि सुगम संगीतावर पेटी वाजवायला सुरुवात केली.
आठवड्यातून दोन दिवस ती कर्वेनगर ते कोथरूड असे घरी येऊन शिकवू लागली.
परंतु करोनामुळे परत क्लास बंद करावा लागला.
परंतु आम्ही दोघींनी जे राग आणि गाणी शिकलो त्याची प्रॅक्टीस घरी सुरू ठेवली आहे.
असा हा पेटी शिकण्याचा प्रवास आणि आवडता छंद असाच हा प्रवास पुढेही चालू रहावा ही अपेक्षा.
तर असे हे सर्वात आवडते वाद्य म्हणजे संवादिनी यामुळे मनाला खूप आनंद मिळतो हे नक्कीच.

9422374323